नि.दि.दावा क्र. २४/२००६
निशाणी क्र. ११९ पुढे सुरु...

प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ ते १४ तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर उलटतपास वादींतर्फे अधिवक्ता श्री. एस. एम. बेळगांवकर यांचेकडून....

१४. मी माझा पुरावा प्रतिवादी क्र. १५ च्या वतीने देत नाही. दावा मिळकतीचा जुना भूमापन क्र. ४३५ असून नवीन गट क्र. ७३८ आहे. दावा जमिनीचे क्षेत्र ३ एकर ३५ गुंठे इतके आहे. वाद मिळकतीच्या चतुःसिमा मला सांगता येतील. त्याच्या पूर्वेस माझे चुलते गनी युन्नूस शहा यांची जमिन, पश्चिमेस इस्माईल महंमद शाह यांची जमिन, दक्षिणेस ओढा व उत्तरेस मांगले यांची जमिन आहेत. हे खरे नाही की, वाद मिळकतीची चतुःसिमा मी सांगतो तशी नाही. हे खरे नाही की, मी सांगत असलेले वाद मिळकतीचे क्षेत्र चुकीचे आहे. वादपत्रासोबतचा हस्तनकाशा आता मला दाखविला. हे खरे नाही की, या हस्तनकाशामधील परिस्थितीप्रमाणे वाद मिळकतीची वस्तुस्थिती आहे.

१५. हे खरे नाही की, वाद मिळकत ही प्रतिवादी क्र. १५ यांच्या मालकीची आहे. हे खरे की, वाद मिळकतीमध्ये माझे वडिल सन १९५७ पासून कुळ म्हणुन होते. हे खरे नाही की, नोव्हेंबर १९८३ मध्ये प्रतिवादी क्र. १५ याने वाद मिळकत विक्रीस काढली होती. हे खरे की, प्रतिवादी क्र. १५ हे कायमस्वरुपी बेळगाव येथे वास्तव्यास आहेत. हे खरे नाही की, नोव्हेंबर २०१५ मध्ये वादी व गावातील काही प्रतिष्ठीत मंडळी बेळगाव येथे जाऊन प्रतिवादी क्र. १५ याची भेट घेतली होती. हे खरे नाही की, वादींनी प्रतिवादी क्र. १५ याची त्यावेळी भेट घेऊन वाद मिळकत खरेदी घेण्याची इच्छा दर्शविली. हे खरे नाही की, त्यावेळी प्रतिवादी क्र. १५ याने वादी व त्यांच्या सोबतच्या इतर लोकांना सांगितले की, वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा माझे वडिल यांच्याकडे असल्याने त्यांनी प्रथम वाद मिळकतीचा कब्जा माझ्या वडिलांकडून घ्यावा.

प्रश्न– नोव्हेंबर २०१५ मध्ये तुम्ही प्रतिवादी क्र. १५ यांच्या घरी हजर नव्हता त्यामुळे तेथे काय घडले याची तुम्हाला माहिती नाही ?

उत्तर– त्यावेळी प्रतिवादी क्र. १५ यांच्या घरी वादी हे गेलेच नव्हते.

हे खरे की, वादी आदम शहा यास माझे वडिल महंमद युन्नूस हे मामा लागतात. हे खरे नाही की,

मयत आदम शहा हे त्यावेळी माझ्या वडिलांना भेटून वाद मिळकतीचा कब्जा त्यास देण्याची विनंती दिली होती. हे खरे नाही की, त्यावेळी माझे वडिल वादी आदम शहा यास वाद मिळकतीचा कब्जा देण्यास तयार झाले. हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी वाद मिळकतीमध्ये केलेल्या पिकाचा व सुधारणाचा मोबदला म्हणून त्यांच्याकडून रक्कम रु. ४,२५१/– घेण्याचे कबूल केले. हे खरे नाही की, दि. ०१/१२/१९८३ रोजी माझ्या वडिलांनी वादी आदम शहा याच्याकडून सदर रक्कम स्विकारुन वाद जमिनीचा प्रत्यक्ष ताबा वादी आदम शहा यास दिला. प्रतिवादी क्र. २ गौस महंमद फकिर हा माझा सख्खा भाऊ आहे. आता मला दाखविलेल्या नि.क्र. ३४ वरील कैफियतीवर तळाशी अनुक्रमांक २ वर असणारी सही प्रतिवादी क्र. २ याची आहे. आता मला यादी नि.क्र. ३ सोबतचे अनुक्रमांक १ वरील जो दस्त दाखविला त्यावर तळाशी गौस महंमद फकिर अशी असणारी सही प्रतिवादी क्र. २ याची आहे हे खरे नाही. हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी वादी कडून रक्कम रु. ४,२५१/– स्वीकारुन वाद मिळकतीमधील आपला कुळ हक्क सोडून देऊन त्याचा प्रत्यक्ष ताबा वादीस दिला होता.

न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत आस्थगित करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत
समक्ष,

स्वाक्षरी/–
(अमृत चं. बिराजदार)
दिनांक: २७.०६.२०१९ दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 27/06/2019 |
| order signed by the P. O. on | 27/06/2019 |
| order uploaded on | 28/06/2019 |